# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
## (शिक्षण विभाग)

दिनांक : 08 / 12 / 2014

क्रमांक : 3488 / शि.वि.

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

.................................. प्राथ. / उच्च प्राथ. / माध्य. शाळा, म.न.पा. नागपूर

**विषय :– शालेय पोषण आहार योजने अंतर्गत विद्यार्थ्यांना 1) मायक्रोन्युट्रीयन्ट सप्लीमेटेशन I.F.A. सिरस**

**संदर्भ :– अ) मा. शिक्षण संचालक प्राथ. शिक्षण संचालनालय पुणे यांचे पत्र क्र. शापोआ / आयएफए / 304 / 4650 2014, दि. 25 / 08 / 2014.**

**ब) शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडील शासन निर्णय क्र. शापोआ 2012 / प्र.क्र.484 / प्राशि 4 (एस.डी.3) दिनांक 14 ऑगष्ट 2014.**

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने शालेय पोषण आहार योजने अंतर्गत विद्यार्थ्यांना मायक्रोन्युट्रीयन्ट सप्लीमेटेशन I.F.A. सिरस वाटप करावयाचे शासनाचे निर्देश आहेत. तरी खालील मार्गदर्शक सुचनेप्रमाणे मायक्रोन्युट्रीयन्ट सप्लीमेटेशन I.F.A. आपले शाळेतील विद्यार्थ्यांना देण्यात यावेत.

1) सदरच्या मायक्रोन्युट्रीयन्ट सप्लीमेटेशन I.F.A. सिरस पात्र शाळेतील **इयत्ता 1 ली ते 5** वी पर्यंतच्या **6 ते** 10 वर्ष वयोगटातील मुलांना द्यावयाचे आहेत.

2) प्रत्येक विद्यार्थ्यास 10 ग्राम प्रतिदिन याप्रमाणे द्यावयाचे आहेत.

3) सदरच्या मायक्रोन्युट्रीयन्ट सप्लीमेटेशन I.F.A. सिरस विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या उपस्थितीतच दुपारच्या जेवणानंतर द्यावयाच्या आहेत, उपाशी पोटी देण्यात येऊ नयेत. यांची संबंधीत मुख्याध्यापक / इंचार्ज मु.अ. तसेच वर्ग शिक्षक यांच्या देखरेखे खाली देण्यात यावे व काळजी घेणे अनिवार्य आहे. तसेच I.F.A. सिरस Exp. date ची शाळेमध्ये नोंद ठेवण्यात यावी. वापरण्याबाबत आवश्यकता वाटल्यास नजीकच्या उपलब्ध वैद्यकीय अधिकाऱ्याचा सल्ला घेण्यात यावा.

4) I.F.A. सिरस बॉटल मध्ये 200 ग्राम रिसप असून प्रति विद्यार्थी 10 ग्राम प्रमाणे औषध देतांना काही प्रमाणात औषध शिल्लक राहणार आहे. त्यावेळी बाटलीचे झाकन व्यवस्थित न लावल्यास विपरित परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तेव्हा बाटलीचे झाकण व्यवस्थीत लावले जाईल याची दक्षता घ्यावी.

IFA सिरप वापराबाबत अधिक माहिती ची आवश्यकता वाटल्यास जवळच्या म.न.पा. दवाखान्याच्या वैद्यकीय अधिकारी यांचा सल्ला घ्यावा. करिता आपले स्तरावरून विद्यार्थ्यांना IFA सिरप बाबत दिलेल्या सुचनेचे पालन करून नियमित व काटेकोरपणे करण्यात यावे. आपल्या शाळेतील वर्ग 1 ते 5 मधील वर्गातील (6 ते 14 वर्षे वयोगटातील) विद्यार्थ्यांची संख्या सोबत लिहून आणावी व मु.अ. रबर स्टॅम्प सोबत आणावा. उपरोक्त योजनेच्या साहित्याचे वाटप दुर्गानगर माध्यमिक शाळा नविन सुभेदार येथे दि. 17 / 12 / 2014 रोजी सकाळी 11.00 ते 3.00 यावेळात वाटप करण्यात येईल. संबंधीत शाळेनी नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

**प्रतिलीपी :–**

1) मा. उपायुक्त म.न.पा. यांच्या माहीतीस्तव सादर.

2) मा. उपसंचालक आरोग्य म.न.पा. नागपूर.

E:/VAN-FEB/VAN-09/Varvatkar Sir